महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २१/०१/२०२०

## पोस्टे पुराडा येथे " भव्य आदिवासी रेला नृत्य कला स्पर्धा" संपन्न

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बंसल सा़ो., व श्री. विक्रांत गायकवाड सा़ो. उप विभागीय पोलीस अधिकारी धानोरा अती. कार्यभार कुरखेडा, यांचे मार्गदर्शनाखाली मौजा पुराडा येथे **"भव्य आदिवासी रेला नृत्य कला स्पर्धा" -** २०२० विभागीय स्तराचे आयोजन दिनांक २०/०१/२०२० रोजी करण्यात आली.

सदर कार्यक्रम श्री. निबोरकर सर पुराडा यंचे अध्यक्षतेखाली श्री बोरकर सर विद्याभारती हायस्कुल पुराडा यांचे हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला फुलहार अर्पण व दिप प्रज्वलीत करुन स्पर्धेचे उद्घाटन झाले. त्यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. दिनेश नाकाडे, डॉ. अनिरुध्द दरवडे, डॉ. सौ. ठलाल मॅडम पुराडा, सौ. फुलकुवर मॅडम पुराडा, सौ. सोनटक्के मॅडम पुराडा, मोहनजी मेश्राम पुराडा, श्री तुकडोजी डोंगरवार पोलीस पाटील चिरचाडी, युवराजी बावणथळे, माजी पोलीस पाटील येंगलखेडा, तसेच प्रभारी अधिकारी पोउपनि एस.पी. गोदे सा़ो. पोउपनि शेडके सा़ो. पोस्टे पुराडा, पोउपनि एस.जी. कांबळे एसआरपीएफ गृप पुराडा, व पोस्टे परिसरातील पोलीस पाटील हजर होते. त्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले.

गडचिरोली जिल्हा दुर्गम व नक्षलग्रस्त अतिसंवेदनशिल आदिवासी बहुल आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांधवाच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्याकरीता त्याचबरोबर त्यांना व्यसपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी पोलीस दलातर्फे "भव्य आदिवासी रेला नृत्य कला स्पर्धा " आयोजित करण्यात आली.

सदर स्पर्धेचे प्रस्ताविकात पोस्टे पुराडाचे प्रभारी अधिकारी एस.पी. गोदे सा़ो. यांनी स्पर्धेचे नियम, अटी, शर्ती आणि स्पर्धेचा उद्देश समजावुन सांगीतला. स्पर्धेदरम्यान परिसरातील आदिवासी नृत्य कलेचे जाणकार ०६ व्यक्तिंना पंच म्हणुन ठेवण्यात आले होते. यावेळी नृत्य कलाकारांनी आपले पुर्वजांकडुन जोपासलेली नृत्य कला सादर केली. संघांनी रेला नृत्यात साकारलेली दृश्ये, प्राणी वास्तविक असावी असेच भासत होते. सर्वच संघांनी अप्रतिम नृत्यकलाविष्काराचे दर्शन घडविले. सदरचे नृत्य बघतांना प्रेक्षकांना नवरसाची मेजवानी घडली. प्रेक्षकांनी मंत्रमुग्ध होवुन रेला नृत्याच्या आनंद घेतला.

या स्पर्धेत उपविभागीय स्तरावरील एकुण ०७ आदिवासी नृत्य कला पथकांनी सहभाग घेतले होते. या संघापैकी आदिवासी लिंगो नृत्य पथक मोहगाव ता. कुरखेडा यांना अनुक्रमे प्रथम क्रमांक देण्यात आली. तसेच पोमके कोटगुल हद्दीतील संघ आदिवासी नवयुवक रेला नृत्य मंडळ ढोलडोंगरी ता. कोरची यांना अनुक्रमे व्दितीय व पोस्टे पुराडा हद्दीतील संघ कै. हिरामणजी पांडव हॉयस्कुल आदिवासी डॉन्स गृप येंगलखेडा यांना अनुक्रमे तृतिय क्रमांक देण्यात आले. सदर विजेत्या संघाला प्रथम ७,०००/- रु. , व्दितीय ५,०००/- रु. व तृतिय ३,०००/- रु. रोख पारितोषीक व चषक, तसेच उर्वरीत संघांना ५००/- रु. रोख प्रोत्साहनपर बक्षिस, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.


उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय
कुरखेडा यांचे वतीने
आदिवासी पारंपारिक (रेला) नृत्य स्पर्धा


उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय
कुरखेडा यांचे वतीने
आदिवासी पारंपारिक (रेला) नृत्य स्पर्धा


उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय
कुरखेडा यांचे वतीने
आदिवासी पारंपारिक (रेला) नृत्य स्पर्धा